Vol 5 Issue 5 Nov 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

**Golden Research Thoughts**
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 5 | Nov - 2015

GRT

# "केंद्रिय कारागृहामध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटुंब व्यवस्थेवर होणारा परिणाम – एक समाजशास्त्रीय अध्ययन"

*चंद्रशेखर सुंदरलाल मालवीय व संजय एस. दुधे*



चंद्रशेखर सुंदरलाल मालवीय

*सारांश :*

आज संपूर्ण जग समस्यांनी ग्रस्त आहे. जसे गुन्हेगारीची समस्या ही जवळपास सर्वच देशांमध्ये आहे. फरक एवढा आहे की, त्याचे स्वरूप, प्रकार आणि तिव्रता हे वेगवेगळया प्रकारचे आहे. परंतु सामाजिक समस्या ह्याा संपूर्ण जगात आहेत. त्यामुळे ह्याा सामाजिक समस्यांचे अध्ययन वैज्ञानिक दृष्टिकोनातून करण्यात येऊ लागले आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात हाताळलेली समस्या ही व्यक्तिच्या विचलनात्मक वर्तनाशी संबंधीत असून मूल्यांशी विसंगत वर्तन केल्यामुळे त्याचे समाजावर कोणकोणत्या प्रकारचे अनिष्ट परिणाम होतात हे दर्शविते. प्रस्तुत अध्ययन हे गुन्ह्याशी संबंधीत असून गंभीर गुन्हे केल्यामुळे व्यक्तिच्या कुटूंबाला कोणकोणत्या गोष्टीला सामोरे जावे लागते? गुन्हेगार व्यक्तिवर त्याचा काय परिणाम होतो? तसेच त्याच्या कुटुंबावर काय परिणाम होतो? त्यांच्या कुटुंबाला कोणकोणत्या कुटूंबविषयक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक आणि सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो? गुन्हे करणाऱ्या व्यक्तिंची कौटुंबिक पार्श्वभूमी काय आहे? गुन्हेगार व्यक्ति कशा प्रकारच्या कौटूंबिक व सामाजिक वातावरणा-तली आहे? इत्यादी गोष्टींचा अभ्यास प्रस्तुत संशोधनाद्वारे करण्यात आला. त्याकरिता अध्ययनकर्त्याने नागपूर कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटूंबाचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात आले.




*प्रस्तावना :*

गुन्हा करणे वा गुन्हा घडणे ही सामाजिक घटना आहे. सामाजिक घटनेला सामाजिक आणि इतर कारणे असतात. तशीच गुन्हा घडण्यासाठी दोन वा अधिक व्यक्तींमध्ये सामाजिक संबंधातून काही प्रसंग घडण्यासाठी दोन वा अधिक व्यक्तींमध्ये सामाजिक संबंधातून काही प्रसंग व्हावे लागतात. गुन्हा घडल्यानंतर त्या घटनेचे परिणाम खरे तर दुष्परिणाम घडल्याशिवाय राहत नाहीत. या परिस्थितीचे आणि कारण परिणामांचे पध्दतशीरपणे निरीक्षण करून मूल्यमापन करणे, कारणमिमांसा करून निष्कर्ष काढणे म्हणजे गुन्ह्याचे समाजशास्त्र. व्यक्ती ज्या समाजात आणि परिसरात वावरत असते त्याच समाजात काही अन्य व्यक्तींचे गट दुष्ट आणि भ्रष्ट व्यवहारात गुंतलेले असतात. हिंसक आणि अनैतिक कारवाया करण्यात ते गट इतके पुढे गेलेले असतात की त्यांना समजाच्या नियमांनुसार आणि कायदेशीर व्यवस्थांनुसार वागण्याचीही गरज वाटत नाही, असे गट विपथगामी आणि समाजविरोधी वर्तनालाच प्रमाण मानून स्वतंत्रपणे वर्तन करतात. त्यांच्यामुळे समाजातील बेकायदेशीरता वाढते, वातावरण असुरक्षित आणि विस्कळीत होते. असे वातावरण दुर्बल अंतर्निग्रहशक्ती असणाऱ्यांना गुन्हा करण्यासाठी प्रेरकच ठरते. अशा वातावरणात कोणीही व्यक्ती मनामध्ये दुष्ट विचार आले वा इच्छित गोष्ट साध्य झाली नाही तर लगेच अनैतिक व असामाजिक वर्तन करण्यास प्रवृत्त होतात. समाजातील व्यवहार जितके अधिक तितकी त्यांच्या नियमनासाठी कायद्यांची आवश्यकता जास्त पडते.

*संशोधनाचे महत्व व आवश्यकता*

भारतात गुन्हेगारीचा सांख्यिकीय माहितीवरून असे आढळून येते की, सामाजिक प्रमाणकानुसार वर्तन करण्यास प्रेरणा देणारे घटक हे दिवसेंदिवस कमकुवत होत आहेत. सामाजिक संबंध आणि सामाजिक निर्बंध याचे विघटन होत

आहे. देशातील सर्वच क्षेत्रात अशांतता दिसून येते. या अशांततेमुळे सामाजिक प्रमाणके आणि कायद्याचे उल्लंघन होण्याची शक्यता ही अधिक आहे. त्यामुळे देशातील गुन्हेगारी समस्येविषयीचे भविष्यातील चित्र विशेष गंभीर आहे.

अशाप्रकारे गुन्हा ही सार्वत्रीक स्वरूपाची समस्या झाली असून व्यक्ति विशिष्ट कारणाच्या प्रभावामुळे गुन्हा करण्यात प्रवृत्त होतो. कारणे कोणतीही असो परंतू त्याचे वाईट परिणाम केवळ त्याच्या कुटूंबावरच नाही तर समाजावरही पडतात. दिवसेंदिवस गंभीर गुन्हे करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. संघटित गुन्ह्यामध्ये सुध्दा वाढ होतांना दिसून येते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गुन्ह्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याचे गंभीर परिणाम समाजावर तर होतातच परंतु गुन्हे करणारा गुन्हेगार व त्याचे कुटुंब यांच्यावर गंभीर स्वरूपाचे परिणाम होतात. त्यांना समाजात अनेक प्रकारच्या सामाजिक आर्थिक व मानसिक परिस्थितीला तोंड द्यावे लागते. मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होतो. त्यांच्या मूलांवर अनेक प्रकारचे विपरीत परिणाम होतात. संघटित कुटुंबाला भग्न कुटुंबाचे स्वरूप प्राप्त होऊन कुटुंबातील सदस्य हे वाईट प्रवृत्तीकडे वळण्याची शक्यता जास्त असते.

### *संशोधनाची उद्दिष्टे*

- गुन्ह्याचे प्रमाण ग्रामीण व शहरी प्रमाणांचा शोध घेवून शिक्षित व निरक्षरांमधील गुन्हेगारी प्रमाण शोधणे.
- कैद्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक समस्येचा अभ्यास करणे.

### *संशोधनाची गृहितकृत्ये*

- गुन्हेगारी प्रवृत्तींच्या लोकांमध्ये कुटुंब विघटनाचे प्रमाण इतर लोकांच्या तुलनेत अधिक असतो

### *संशोधन आराखडा*

संशोधनाचे उद्देश निश्चित केल्यानंतर त्या उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी योजनाबध्द रूपात संशोधन कार्याची योजना आखून आराखडा तयार करण्यात आला. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधनकर्त्याने वर्णनात्मक संशोधन आराखडा 'Descriptive Research Design' ची निवड केली आहे.

### *अध्ययन क्षेत्र*

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन नागपूर केंद्रिय कारागृहात जन्मठेप व फाशीची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटूंबीयांच्या वास्तव्य क्षेत्राची निवड करण्यात आली. कारण या केंद्रिय कारागृहामध्ये नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा इ. जिल्ह्यातील गुन्हा करणारे व ज्यांना जन्मठेप झाली आहे असे गून्हेगार शिक्षा भोगत आहे.

### *नमूना निवड*

प्रस्तुत संशोधन कार्यात स्तरीय यादृच्छिक न्यादर्श निवड केलेली आहे. या संशोधनाकरीता नागपूर मध्यवर्ती कारागृहातून जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची यादी प्राप्त करण्यात आली. या यादीमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले (८४०) कैदी होते. त्या ८४० कैद्यांच्या संख्येतून लॉटरी पद्धतीचा (यादृच्छिक पद्धत) वापर करून ३०० नावांची निवड करण्यात आली. त्यानुसार कैद्यांच्या कुटुंबाचा शोध घेण्यात आला. शोध घेतना १४ कैद्यांच्या कुटुंबाचा पत्ता बरोबर नसल्याने त्यांची माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे अभ्यासाच्या दृष्टीने २८६ उत्तरदात्यांची निवड करून त्यांच्याद्वारे प्रश्नावली भरून घेण्यात आली. परंतु, ३६ प्रश्नावलीत अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे शेवटी २५० उत्तरदात्यांची संशोधनाकरिता निवड करण्यात आली.

### *तथ्य संकलन पद्धती*

प्रत्यक्ष माहितीच्या सकंलनासाठी मुलाखत अनुसूची व सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. उत्तरदात्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी भेटी देवून त्यांची मुलाखत घेण्यात आली. मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून मुलाखत घेण्यात आली व त्या माध्यमातून तथ्ये संकलित करण्यात आले. मुलाखत अनुसूची निर्मिती मार्गदर्शकाच्या निर्देशनामध्ये करण्यात आली आणि सोबत या विषयाचे विशेषज्ञ व व्यवसायिक व्यक्तिंचा सल्ला घेतला गेला. त्याचप्रमाणे, तथ्य संकलनासाठी विविध दैनिक, साप्ताहिके, गुन्हेगारी संबंधित मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके, इंटरनेट व इतर प्रकाशित साहित्यांचे अध्ययन केले गेले.

### *माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण*

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राहयता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरीता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता योग्य सांख्यकीय चाचणीचा वापर करून कैद्यांच्या कुटूंब व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला.

## सांख्यिकीय विश्लेषण आणि अर्थविवेचन
### कैद्यांच्या कुटुंबाचे वास्तव्याचे ठिकाण

**सारणी क्र 1: कैद्यांच्या कुटुंबाचे वास्तव्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | वास्तव्याचे ठिकाण | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ग्रामीण | ५६ | २२.४ |
| २. | शहरी | १९४ | ७७.६ |
| | एकूण | २५० | १०० |

वरील सारणी क्र १ मध्ये अध्ययन क्षेत्रातील जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटुंबाचे त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दिलेल्या माहितीनुसार ७७.६ टक्के जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचे कुटुंब शहरी भागातील असून २२.४ टक्के कैद्याचे कुटुंब ग्रामीण भागातील असल्याचे निदर्शनास आले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या जास्तीत जास्त कैद्याचे कुटुंब शहरी भागातील आहेत.

### कैद्याच्या कुटुंबातील व्यक्तिंची शैक्षणिक स्थिती

**सारणी क्र 2: कैद्याच्या कुटुंबातील व्यक्तिंचे शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ. क्र. | शिक्षण | स्त्री | | पुरूष | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
| १. | अशिक्षित | ४८ | १६.२ | ११ | ४.४ | ५६ | २३.६ |
| २. | प्राथमिक | ५१ | २०.४ | ११ | ४.४ | ६२ | २४.८ |
| ३. | माध्यमिक | ८६ | ३४.४ | २० | ८ | १०६ | ४२.४ |
| ४. | उच्च माध्यमिक | १६ | ७.६ | ४ | १.६ | २३ | ६.२ |
| ५. | पदविधर | – | – | – | – | – | – |
| ५. | पदव्युत्तर | – | – | – | – | – | – |
| | एकूण | २०४ | ८१.६ | ४६ | १८.४ | २५० | १०० |

वरील सारणी क्र २ मध्ये अध्ययन क्षेत्रातील जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंचे शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४२.४ टक्के कैद्याच्या कुटुंबातील व्यक्ति माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षित असून २४.८ टक्के कैद्याच्या कुटुंबातील व्यक्ति प्राथमिक स्तरापर्यंत शिक्षित असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे २३.६ टक्के कैद्याच्या कुटुंबातील व्यक्ति अशिक्षित असून उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षित असणाऱ्या कैद्याच्या कुटुंबातील व्यक्तिंचे शेकडा प्रमाण ६.२ असल्याचे निदर्शनास आले. वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले बहुतांश कैद्याच्या कुटुंबातील व्यक्ति केवळ माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षित आहेत. सारांशतः असे म्हणता येते की, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कुटुंबाची शैक्षणिक पार्श्वभूमी ही उच्च शिक्षित नाही. याचा अर्थ असा की, कमी शिक्षित लोकांमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात गुन्हेगारी प्रवृत्ती आढळून येते.

### कैद्यांचा कुटुंब प्रकार

**सारणी क्र 3: कैद्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंचे कुटुंब प्रकारानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | कुटुंबाचा प्रकार | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त कुटुंब | १८८ | ७५.२ |
| २. | विभक्त कुटुंब | ६२ | २४.८ |
| | एकूण | २५० | १०० |

वरील सारणी क्र ३ मध्ये अध्ययन क्षेत्रातील जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंचे कुटुंब प्रकारानुसार वर्गीकरण दर्शविण्यात आले आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७५.२ टक्के व्यक्ति संयुक्त कुटुंबात राहत

असून २४.८ टक्के व्यक्ति विभक्त कुटुंबात राहत असल्याचे निदर्शनास आले. वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले बहुतांश सदस्य संयुक्त कुटुंबातील आहेत. घरातील प्रमुख सदस्य जन्मठेपेची शिक्षा भोगत असल्यामुळे व कुटुंबाला वडीलधाऱ्या व्यक्तीचा आधार हवा असल्यामुळे बहुतांश कुटुंबे संयुक्त कुटुंबात वास्तव्यास असल्याचे स्पष्ट होते.

### *कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे कुटुंबावर होणारा परिणाम*

*सारणी क्र 4: कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे कुटुंबावर होणाऱ्या परिणाम दर्शक सारणी*

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यावर परिणाम | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक परिस्थिती बिघडते | २५० | १०० |
| २. | कुटुंबाच्या गरजा पूर्ण होवू ाकत नाही | २१३ | ८५.२ |
| ३. | कुटुंब विस्कळीत होते | २२० | ८८.० |
| ४. | समाजाचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृ टीकोन बदलतो | २५० | १०० |
| ५. | मानसिक संतुलन बिघडते | १२९ | ५१.६ |
| ६. | कुटुंबातील सदस्य वाम मार्गास लागण्याची ाक्यता जास्त असते | ९५ | ३८.० |
| ७. | शिक्षणापासून मुले वंचित राहतात. | २१२ | ८४.८ |

सारणी क्र ४ मध्ये कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे कुटुंबावर होणाऱ्या परिणामांसंबंधी अध्ययन क्षेत्रातील कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार प्रत्येकी १०० टक्के कैद झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे आर्थिक परिस्थिती बिघडते व समाजाचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. त्याचप्रमाणे कैद झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे कुटुंब विस्कळीत होते, कुटुंबाच्या गरजा पूर्ण होवू शकत नाही, शिक्षणापासून मुले वंचित राहतात, मानसिक संतुलन बिघडते व कुटुंबातील सदस्य वाम मार्गास लागण्याची शक्यता जास्त असते हे नमूद करणाऱ्या कैद झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांचे शेकडा प्रमाण क्रमशः ८८.०, ८५.२, ८४.८, ५१.६ व ३८.० असल्याचे निदर्शनास आले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट बहुतांश कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते कुटुंबातील व्यक्ती तुरूंगात असल्यामुळे आर्थिक परिस्थिती बिघडते व समाजाचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.

### *गुन्हेगारीला कारणीभूत घटक*

*सारणी क्र 5: गुन्हेगारीला कारणीभूत पारिवारीक आणि सामाजिक घटक*

| अ.क्र. | गुन्हेगारीला कारणीभूत पारिवारीक आणि सामाजिक घटक | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १८९ | ७५.६ |
| २. | नाही | १२ | ४.८ |
| ३. | सांगता येत नाही | ४९ | १९.६ |
| **एकूण** | | **२५०** | **१००** |

सारणी क्र ५ मध्ये गुन्हेगारीला पारिवारीक आणि सामाजिक घटक कारणीभूत ठरण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ७५.६ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या गुन्हेगारीला पारिवारिक व सामाजिक घटक कारणीभूत ठरत असून गुन्हेगारीला पारिवारिक व सामाजिक घटक कारणीभूत ठरण्यासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांचे शेकडा प्रमाण १९.६ असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे केवळ ४.८ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते गुन्हेगारीला पारिवारिक व सामाजिक घटक कारणीभूत ठरत नसल्याचे निदर्शनास आले.

वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट बहुतांश कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते गुन्हेगारीला पारिवारिक व सामाजिक घटक कारणीभूत ठरतात. सामाजिक विषमता, जातीभेद, आर्थिक विषमता, विशिष्ठ वर्गाची वरचढवृत्ती इत्यादींमुळे सामाजिक असमतोल उत्पन्न होतो व या असमतोलातून वैय्यक्तिक व सामाजिक संघर्षाचे बी पेरलेजाऊन त्याची परिणीती भयंकर गुन्ह्याच्या स्वरूपात होऊ शकते. यामुळे जन्मठेपाची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याच्या बहुतांश कुटुंबियांनी सामाजिक घटकांना गुन्ह्याचे कारण मानले आहे.

### कैद झाल्यामुळे कुटुंब व्यवस्थेवर झालेला परिणाम

**सारणी क्र 6: समाजातील लोकांचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासंबंधी**

| अ.क्र. | समाजातील लोकांचा कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १२३ | ४९.२ |
| २. | नाही | ६२ | २४.८ |
| ३. | सांगता येत नाही | ६५ | २६.० |
| | **एकूण** | **२५०** | **१००** |

सारणी क्र ६ मध्ये कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४६.२ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते त्यांच्या कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टिकोन बदलला असून २४.८ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते त्यांच्या कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टिकोन बदलला नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टिकोन बदलण्यासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांचे शेकडा प्रमाण २६ असल्याचे निदर्शनास आले.

वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट बहुतांश कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टीकोन बदलला आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीशी संलग्न असल्यामुळे जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्याच्या कुटुंबियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण हा बदललेला असतो या मागे भीती, संशय अथवा राग हे देखील कारणीभूत असू शकतात.

### कैद झाल्यामुळे कुटुंबाची समाजात पत राहीली नाही

**सारणी क्र 7: कुटुंबातील व्यक्तिला कैद झाल्यामुळे कुटुंबाची समाजात पत राहीली नाही**

| अ.क्र. | कुटुंबाची समाजात पत राहीली नाही | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १२५ | ५०.० |
| २. | नाही | ४२ | १६.८ |
| ३. | सांगता येत नाही | ८३ | ३३.२ |
| | **एकूण** | **२५०** | **१००** |

सारणी क्र ७ मध्ये कुटुंबाकडे पाहण्याचा समाजातील लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५० टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांना कुटुंबाची समाजात पत आहे असे वाटत असून कुटुंबाची समाजात पत राहीली नाही असे वाटण्यासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांचे शेकडा प्रमाण ३३.२ असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १६.८ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते कुटुंबाची समाजात पत राहीली नाही असे वाटत असल्याचे निदर्शनास आले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट बहुतांश कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांना कुटुंबाची समाजात पत आहे असे वाटते.

### व्यक्तिला कैद झाल्यामुळे कुटुंबाचे विघटन

**सारणी क्र 8: कुटुंबातील व्यक्तिला कैद झाल्यामुळे कुटुंबाचे विघटन होण्यासंबंधी**

| अ.क्र. | कुटुंबाचे विघटन झाले असे आपणांस वाटते काय? | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १२३ | ४९.२ |
| २. | नाही | ५६ | २२.४ |
| ३. | सांगता येत नाही | ७१ | २८.४ |
| | **एकूण** | **२५०** | **१००** |

सारणी क्र ८ मध्ये कुटुंबाचे विघटन होण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४६.२ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते त्यांच्या कुटुंबाचे विघटन झाले असून कुटुंबाचे विघटन होण्यासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांचे शेकडा प्रमाण २८.४ असल्याचे निदर्शनास आले. तसेच २२.४ टक्के कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते त्यांच्या कुटुंबाचे विघटन झाले नसल्याचे निदर्शनास आले. वरील माहितीवरून असे निदर्शनास येते की, या अध्ययनात समाविष्ट बहुतांश कैद झालेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या मते त्यांच्या कुटुंबाचे विघटन झाले आहे.

### *गृहितकृत्याचे परीक्षण*

### *गुन्हेगारी प्रवृत्तींच्या लोकांमध्ये कुटुंब विघटनाचे प्रमाण इतर लोकांच्या तुलनेत अधिक असतो*

अध्ययनातून प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले खरे कैदी संयुक्त कुटुंबातील आहेत. यावरून म्हणजेच गुन्हेगारी करीता ते कुटुंब कोणत्या पद्धतीचे आहे याचा काहीही संबंध नाही.

### *संदर्भग्रंथ सूची*

१) शर्मा, कृष्णकुमार., मानवाधिकार विश्वकोश, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, प्रथमसंस्करण २०११, दिल्ली
२) काळदाते सुधा, गोटे-गाव्हाणे शुभांगी, गुन्हेगारीचे समाजशास्त्र (अपराधशास्त्र), श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २००३, पुणे.
३) गृह (तुरूंग) विभाग, महाराष्ट्र शासन, नागरिकांची सनद, मंत्रालय, मुंबई-४०० ०३०.
४) घोडे रमेश (१९९८) आधुनिक समाजशास्त्रीय सिध्दांत- निराली प्रकाशन पुणे.
५) खडसे भा. कि., भारतातील सामाजिक समस्या, श्री मंगेश प्रकाशन, २०११
६) खैरनार दिलीप, प्रगत सामाजिक संशोधनपद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन
७) काळदाते सुधा, गुन्हेगारीचे समाजशास्त्र- विद्याप्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २६ जाने. २००३
८) कोडेकर वाय.ए, भारतातील आजच्या सामाजिक समस्या- फडके प्रकाशन कोल्हापूर प्रथम आवृत्ती डिसें, १९९८
९) भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती- महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, द्वितीय आवृत्ती १९८१
१०) आगलावे प्रदीप "सामजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे" श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, वर्ष २००८, पृ.क्र. १८
११) बोधनकर सुधीर, सामाजिक संशोधन पध्दती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर १०, दुसरी आवृत्ती १९९९
१२) लोटे रा. जा.; भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००६.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org